**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. बापूसाो गोविंद देसाई,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण संचालनालय, — उत्तरवादी
महापालिका मार्ग, मुंबई १
श्री. रामचंद्र तुकाराम कांबळे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,पुणे ५
श्री. साहेबराव किसन दरेकर

## विवेचन

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपिलकर्ता**<br>श्री. बापूसाो गोविंद देसाई,<br>जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा**<br>उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व<br>प्रशिक्षण संचालनालय, मुंबई<br>श्री. रामचंद्र तुकाराम कांबळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां),<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय,पुणे ५<br>श्री. साहेबराव किसन दरेकर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/८/२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६/९/२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२/११/२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३/४/२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर यांच्या अपील नंबर ९८,९९,१००/२००३ वर दि. २८/४/२००५ च्या आदेशानुसार उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग पुणे यांनी काय कार्यवाही केली, त्याबाबतचा तपशील व कागदपत्रे. कार्यवाही केली नसल्यास न करण्याची सविस्तर कारणे. त्यामुळे कोर्टाचा अवमान होत नाही का, व कार्यवाही कधी करणार त्याचा निश्चित दिनांक |

## विवेचन

पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर यांनी अपील क्र. ९८, ९९, १००/२००३ मध्ये दि. २८.४.२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ४० दिवसांच्या मुदतीत उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग, पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. बापूसाहेब गोविंद देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) व्यवसाय व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे ५ यांच्याकडे मागितली होती. कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे व कार्यवाही करण्याचा निश्चित दिनांक याचा तपशील त्यांनी मागितला होता. लट्ठे एज्युकेशन संस्था, सांगली यांच्याशी संबंधित असा हा विषय असून श्री. देसाई यांनी या संस्थेकडेही ही माहिती मागितली होती, परंतु संस्थेने ती दिली नाही, असे श्री. देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात नमूद केले आहे.

या प्रकरणी लट्ठे एज्युकेशन संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात रिट दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असल्याने माहिती पुरविणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी त्यांना कळविले, त्याविरुध्द अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे त्यांनी अपील केले. शाळा न्यायाधिकरणाच्या निर्णयावर उपसंचालक कार्यालयाने जी काही कार्यवाही केली त्याची संपूर्ण माहिती देण्यात यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री. आर.आर. आसावा यांनी दिला. परंतु तरीही श्री. देसाई यांना अपेक्षित माहिती दिली गेली नाही.

प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे जन माहिती अधिका-यांनी नमूद केलेले कारण चुकीचे आहे. संबंधित माहिती देण्याने न्यायालयीन प्रक्रियेत कोणताही व्यत्यय येत नाही, तसेच अशी माहिती देऊ नये असा आदेश न्यायालयाने दिलेला नाही.

शाळा न्यायाधिकरणाने दि. २८.४.२००५ रोजी निर्णय दिला व ४० दिवसांमध्ये कार्यवाही करण्याचे आदेश दिले. शिक्षण उपसंचालक कार्यालयाने अशी कार्यवाही केली नाही. संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात जुलै २००५ मध्ये रिट दाखल केलेले आहे व 'पद रिक्त झाल्यास व अर्जदार पात्र असल्यास नेमावे' असा हंगामी आदेश उच्च न्यायालयाने दि. १२.८.२००५ रोजी दिला आहे. संस्थेने ४० दिवसात (रिट दाखल होण्यापूर्वी ) कार्यवाही का केली नाही, याबाबत उपसंचालक कार्यालयाने दक्षता घेतलेली

नाही. विनाअनुदानित संस्थेवर शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे नियंत्रण नसते, असे आयोगापुढील सुनावणीत संबंधित अधिका-यांनी सांगितले. परंतु अशा संस्थांमधील परीक्षा व आवश्यक साधनसामग्रीची पूर्तता यावरील देखरेख व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातर्फे केली जाते, हे लक्षात घेता न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत या संचालनालयामार्फत सूचनापत्र जाणे शक्य व आवश्यक होते. रिट अर्ज दाखल होण्यापूर्वी संचालनालयाने हे केले असते तर आपले मोठे नुकसान टळले असते, असे प्रतिपादन श्री. देसाई यांनी केले. एकूण कागदपत्रे व निवेदने विचारात घेता या बाबतीत, तसेच माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी निष्काळजीपणा केला आहे, असे दिसते. मात्र विहित मुदतीत त्यांनी पत्रव्यवहार केला आहे. तसेच दि. ५.५.२००६ रोजी संबंधित माहिती श्री. देसाई यांना दिलेली आहे, असे उत्तरवादीतर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांत नमूद केले आहे.

वरील बाबींचा विचार करुन आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. जन माहिती अधिका-यांनी माहिती देणे टाळण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे, व या पुढे माहिती देण्याबाबत त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

पुणे
दिनांक :- १२/७/२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

डॉ. सौ. सुनिता माधव झुंजरवाड
झुंजरवाड हॉस्पिटल, भक्ती मार्ग,
पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरु ध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी
डॉ. प्रकाश दुधनी

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी, जिल्हा कुटुंब कल्याण ब्युरो,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर
श्री. सूर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.५.२००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ. सौ. सुनिता माधव झुंजरवाड यांचेतर्फे डॉ. माधव व्यंकटेश झुंजरवाड, झुंजरवाड हॉस्पिटल, भक्ती मार्ग, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
डॉ. प्रकाश दुधनी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.५.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.५.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.५.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

हॉस्पिटलचा बोगस शिक्का व बोगस सही करुन कुटुंब नियोजन फॉर्म भरुन खोट्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याबद्दल दि. १४.३.२००५ रोजी केलेल्या तक्रारी अर्जाची व पंढरपूर पोलिस स्टेशनला केलेल्या तक्रारीचे उत्तर

## विवेचन

आपल्या हॉस्पिटलचा बनावट शिक्का करुन व आपली खोटी सही करुन कुटुंब नियोजनाचा फॉर्म भरुन कुटुंब नियोजन शस्त्रकिया केल्याचे खोटे प्रकार घडले, याबाबत केलेल्या तकारीनंतर काय कारवाई केली, याची माहिती अपीलकर्ता डॉ. सौ. सुनीता माधव झुंजरवाड यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जिल्हा कुटुंब कल्याण ब्युरो, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. 'चौकशीअंती दोषी आढळणा-या कर्मचा-यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल व यापुढे असे प्रकार घडणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येईल,' असे त्यांना अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. प्रकाश दुधनी यांनी दि. २०.६.२००५ रोजी कळविले. आपल्याला चौकशीचा पूर्ण अहवाल मिळाला नाही, म्हणून डॉ. सौ. झुंजरवाड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यांच्यापुढील सुनावणीला डॉ. सौ. झुंजरवाड उपस्थित राहिल्या नाहीत. त्यामुळे त्यांचा अर्ज अपिलीय प्राधिका-यांनी विहित मुदतीनंतर दि. १५.५.२००६ रोजी निकाली काढला. दरम्यान डॉ. सौ. झुंजरवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.५.२००६ रोजी अपील दाखल केले आहे.

डॉ. सौ. झुंजरवाड यांचा मूळ अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खाली दि. १२.५.२००५ रोजी केलेला आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आता अस्तित्वात आला असून महाराष्ट्राचा कायदा निरस्त झाला आहे, मात्र संबंधित अपील केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमाखाली मान्य करुन स्वीकारण्यात येत आहे.

अर्ज केला तेव्हा महाराष्ट्राच्या कायद्यानुसार माहिती देण्यास असलेली १५ दिवसांची मुदत आणखी १५ दिवस वाढवून देण्याविषयीचे पत्र जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी डॉ. सौ. झुंजरवाड यांना दि. ३१.५.२००५ रोजी पाठविले. त्यानंतर दि. २०.६.२००५ रोजी 'दोषी कर्मचा-यांवर योग्य ती कारवाई करु व या पुढे दक्षता घेऊ,' असे श्री. झुंजरवाड यांना पत्रान्वये कळविले. ही उत्तरे अपिलीय प्राधिका-यांनी दिलेली आहेत. आयोगापुढील सुनावणीतही जन माहिती अधिका-यांच्या वतीनेही तेच उपस्थित होते.

डॉ. सौ. झुंजरवाड व त्यांचे पती डॉ. माधव व्यंकटेश झुंजरवाड यांनी पंढरपूर पोलिस ठाण्यात निरीक्षक, शहर विभाग यांच्याकडेही दि. १४.३.२००५ रोजी तक्रार दाखल केली आहे. दोन्हीही पातळ्यांवर या गंभीर प्रकरणाची योग्य चौकशी होत नसल्याचे व दोषी असणा-यांविरुध्द योग्य ती कारवाई केली जात नसल्याचे डॉ. श्री. व सौ. झुंजरवाड यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. 'सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे या प्रकरणी आपण दाद मागितली होती. परंतु त्यांनी आपला अर्ज / अपील पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा आरोग्य अधिका-यांकडेच पाठविले. ज्यांच्या विरुध्द आपली तक्रार आहे तेच त्याबाबत चौकशी करणारे व अपिलीय प्राधिकारी आहेत, हे विसंगत वाटल्यामुळे आपण त्यांच्यापुढील सुनावणीच्या वेळी उपस्थित राहिलो नाही,' असे डॉ. माधव व्यंकटेश झुंजरवाड यांनी डॉ. सौ. झुंजरवाड यांच्या वतीने स्पष्ट केले.

'या प्रकरणाची पूर्ण चौकशी गट विकास अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी संयुक्तपणे केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे येथील आरोग्य कर्मचा-यांनी सन २००२-२००३ ते २००५-२००६ या कालावधीत वेगवेगळ्या खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांकडील ११५ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांची खाजगी प्रमाणके दिलेचे आढळून आले. त्या प्रमाणकातील लाभार्थी कार्यक्षेत्राबाहेरील असलेने व त्यापोटी रु. २३०००/- शासकीय अनुदान खर्ची पडलेने ही सर्व रक्कम संबंधित जबाबदार

असणारे सहा कर्मचारी यांचेकडून वसूलपात्र असलेचे चौकशी अहवालावरुन दिसून आलेने सदर रक्कम सर्व संबंधितांकडून वसुलीची कारवाई करुन आज अखेर रु.२०,०००/- वसूल झाले आहेत. उर्वरीत रु.३०००/- संबंधित कर्मचारी कामावर गैरहजर असलेने वसुली करता आली नाही. तसेच या प्रकरणाशी संबंधित दोषी असलेल्या सर्व कर्मचा-यांची एक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करणेची शास्ती देणेत आली आहे.

'अशा बाबींना आळा घालणेचे दृष्टीने सन २००५-०६ पासून खाजगी शस्त्रक्रियाच्या नोंदी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेकडील आर- ३ रजिस्टरला घेणेचे अधिकार रद्द करुन ते तालुक्यासाठी एकत्रितरीत्या पंचायत समिती स्तरावर तालुका वैद्यकीय अधिकारी यांना देणेत आले असून अशा शस्त्रक्रियांबाबत योग्य ती छाननी व चौकशी करुन त्यांच्या नोंदी तालुका स्तरावरील आर - ३ रजिस्टरमध्ये घेणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत,' असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी ( दि. १६.५.२००७) व तोंडी नमूद केले आहे.

कुटुंब नियोजनासारख्या अत्यंत महत्त्वाच्या कार्यक्रमाबाबत खाजगी डॉक्टरांच्या बनावट सह्या व शिक्क्याच्या आधारे खोट्या शस्त्रक्रिया दाखवून लाखो रुपयांचा अपहार घडत आहे, असे डॉ. झुंजरवाड यांचे म्हणणे आहे. या संदर्भात त्यांच्या स्वतःच्या सही-शिक्क्याचा वापर करुन खोटी प्रकरणे दाखविल्याचे सिध्दही झाले आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर, जिल्हा पोलिस अधीक्षक, सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर, जिल्हा आरोग्य अधिकारी, अशा विविध पातळ्यांवर हा गंभीर प्रश्न मांडण्याचा प्रयत्न डॉ. झुंजरवाड पती-पत्नी करीत आहेत. वारंवार अर्ज, विनंत्या करुन पाठपुरावा केल्यानंतरही त्याची म्हणावी तशी दाखल घेतली गेल्याचे दिसत नाही. मार्च २००५ मधील या गुन्ह्याबाबत संबंधित कर्मचा-याला पगारवाढ व दंड केल्याचे पत्र जिल्हा आरोग्य अधिका-यांनी दि. २६.३.२००६ रोजी पाठविले, परंतु खोट्या सह्या व शिक्के प्रकरणातील गुन्हा मात्र पंढरपूर पोलिसांनी दि. ९.३.२००७ रोजी नोंदविला. जवळ जवळ दोन वर्षे पोलिसांनी गुन्हाच नोंदविला नव्हता, असे यावरुन स्पष्ट होते. त्यामुळेच पोलिसांकडे नोंदविलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची कोणतीही माहिती दिली गेली नाही, असे दिसते. 'सोलापूर जिल्ह्यात गेल्या आठ वर्षांत कुटुंबनियोजनाचे उद्दिष्ट ११० ते

१२० टक्के पूर्ण होत असल्याचे दाखविण्यात आले आहे. फौजदारी गुन्हा नोंदविताना सर्व प्रकरणाची चौकशी केल्यास यामधील संगनमताने अपहार करणाऱ्या साखळीबाबतचे सत्य उजेडात येईल,' असे डॉ. झुंजरवाड पती - पत्नींचे म्हणणे आहे. 'वस्तुतः याबाबत जिल्हा आरोग्य अधिका-यांनी दोषी कर्मचा-यांना जुजबी शिक्षा करुन पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे,' असा डॉ. झुंजरवाड यांचा आरोप आहे. परंतु आपण दोषी व्यक्तींना पाठीशी घालत नसून संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश दुधनी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. दोषी व्यक्तींविरुध्द १५ दिवसांच्या आत फौजदारी गुन्हा नोंदवून गुन्हा नोंदविल्याच्या प्राथमिक अहवालाच्या नक्कलेसह सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश दुधनी यांनी आयोगापुढे मान्य केले.

मात्र सुनावणी होऊन महिना उलटला तरी अशी कोणतीही कार्यवाही जिल्हा आरोग्य अधिका-यांनी केलेली नाही , असे डॉ. झुंजरवाड यांनी दि. २४.६.२००७ च्या पत्रान्वये निदर्शनास आणले आहे. आयोगापुढे कबूल केलेली माहिती दिल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य अधिका-यांकडून आयोगालाही प्राप्त झालेला नाही. याचा अर्थ , आयोगालासुध्दा त्यांनी सत्य माहिती दिलेली नाही , असा होतो.

मागितलेल्या माहितीचे गांभीर्य लक्षात घेता, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश दुधनी यांनी आवश्यक त्या व केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती अपीलकर्त्याला देणे आवश्यक आहे. हा विषय एखाद्या डॉक्टरपुरता किंवा इस्पितळापुरता मर्यादित नसून आरोग्य कल्याणासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयाशी संबंधित व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा असा आहे. तसेच केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अपेक्षित असलेल्या, सार्वजनिक जीवनातील व्यवहारांच्या पारदर्शकतेशीही तो निगडीत आहे. म्हणून प्रशासनाने केलेली कार्यवाही जनतेपुढे येणे आवश्यक आहे. जिल्हा आरोग्य अधिका-यांबरोबरच मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, सोलापूर व पोलिस अधीक्षक, सोलापूर, यांनीही याची दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे.

विषयाची व्याप्ती , उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दुधनी यांनी वरील प्रकरणातील दोषी व्यक्तींविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवून केलेल्या कार्यवाहीची माहिती दि. ५.८.२००७ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी. त्याबाबतचा पूर्तताअहवाल आयोगाला पाठवावा. याची पूर्तता न झाल्यास आयोगाला अयोग्य माहिती दिल्याबद्दल त्यांच्याविरुध्द कारवाई करावी लागेल. त्यात महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील ) यानुसार प्रशासकीय कारवाईचाही समावेश असू शकेल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व जिल्हा पोलिस अधीक्षक, सोलापूर यांनी या विषयात लक्ष घालून या बाबतची संपूर्ण माहिती जनतेपुढे येण्यासाठी उपाययोजना करावी. आपण केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल त्यांनी दि. १०.८.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

पुणे
दिनांक :- २४/७/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दुधनी यांनी वरील प्रकरणातील दोषी व्यक्तींविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवून केलेल्या कार्यवाहीची माहिती दि. ५.८.२००७ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी. त्याबाबतचा पूर्तताअहवाल आयोगाला पाठवावा. याची पूर्तता न झाल्यास आयोगाला अयोग्य माहिती दिल्याबद्दल त्यांच्याविरुध्द कारवाई करावी लागेल. त्यात महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील ) यानुसार प्रशासकीय कारवाईचाही समावेश असू शकेल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व जिल्हा पोलिस अधीक्षक, सोलापूर यांनी या विषयात लक्ष घालून या बाबतची संपूर्ण माहिती जनतेपुढे येण्यासाठी उपाययोजना करावी. आपण केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल त्यांनी दि. १०.८.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

पुणे
दिनांक :- २४/७/२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. पांडुरंग भिमसेन राजे
४४, पंताचा गोट, सातारा .. अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
विभागीय आयुक्त, व प्रादेशिक
संचालक, नगरपरिषद प्रशासन, .. उत्तरवादी
पुणे विभाग, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १५.५.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पांडुरंग भिमसेन राजे, ४४, पंताचा गोट, सातारा

**सहाय्यक जन माहिती अधिकारी**
सातारा नगरपरिषद, सातारा श्री. मोहन सुरेश प्रभुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | आदेश अप्राप्त |

**८. मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

१. सातारा शहर नगरपरिषदेची बांधकाम विकास नियंत्रण नियमावली
२. सातारा शहरातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची यादी, नाव व पत्यासह
३. अंत्योदय, वाल्मीकी आवास योजना, इंदिरा आवास योजना या अंतर्गत लाभ घेणा-या सातारा शहरातील लाभार्थ्यांची यादी नाव व पत्यासह
४. आयुक्त, पुणे विभाग यांनी लेखा परिक्षणाबाबत केलेल्या टिप्पणीची सांक्षांकित प्रत
५. माहिती अधिकार अधि. २००५ च्या कलम ४(१)(ब) प्रमाणे आवश्यक त्या १७ बाबींवरील माहिती कार्यालयाने प्रसिध्द केली आहे काय, केली असल्यास कधी व कोणत्या वृत्तपत्रात

## विवेचन

सातारा शहर नगर परिषदेची बांधकाम विकास नियंत्रण नियमावली, सातारा शहरातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांची नाव, पत्यासह यादी आदि पाच मुद्यांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. पांडुरंग भिमसेन राजे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा यांच्याकडे मागितली होती. त्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर पाठविले :

१. 'अ' वर्ग नगरपरिषदांसाठी शासनाने केलेली विकास नियंत्रण नियमावलीच सातारा नगरपरिषदेमार्फत वापरली जाते.
२. लाभार्थी निश्चित करण्याचे काम सुरु असल्यामुळे यादी देता येणार नाही.
३. अंत्योदय, इंदिरा आवास योजना या सातारा नगरपरिषदेमार्फत राबविल्या जात नाहीत. त्यामुळे नगरपरिषदेकडे त्यांची माहिती उपलब्ध नसून ती देता येणार नाही.
वाल्मिकी / आंबेडकर आवास योजनेमधील लाभार्थींची यादी पुरविली.
४. नमूद केलेल्या (दि. २१.९.२००५ ते ३०.१.२००६ या ) कालावधीत सातारा नगरपरिषदेचे लेखा परीक्षण झालेले नसल्यामुळे त्या बाबतची टिप्पणी नाही.
५. आवश्यक त्या १७ बाबीं विषयीची माहिती नगरपरिषदने नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली आहे.

जन माहिती अधिका-याच्या या उत्तराने समाधान न झाल्याने श्री. राजे यांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले. या अपिलाची दखल घेतली गेली नाही. जन माहिती अधिका-यांकडून अपुरी व चुकीची माहिती मिळाली, आणि त्यांनी अपिलाची मुदत, अपिलीय प्राधिका-याबाबतची माहिती हे कळविणे बंधनकारक असताना ते न कळविल्यामुळे जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले, त्याची दखल घेतली गेली नाही, या कारणावरुन श्री. राजे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

जिल्हाधिकारी, सातारा हे प्रथम अपिलीय प्राधिकारी नसून विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे हे या संदर्भात प्रथम अपिलीय प्राधिकारी आहेत. श्री. राजे यांनी त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते, असे जन माहिती अधिका-यांनी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. जिल्हाधिकारी, सातारा यांनीही या स्वरुपाचा खुलासा पत्राद्वारे केला आहे. ही माहिती त्यांनी अर्जदाराला दि. ३.३.२००६ रोजी अपील केले तेव्हाच देणे आवश्यक होते. परंतु त्यानंतरही वर्षभराच्या कालावधीत त्यांनी ते केले नाही. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्याच्या प्रारंभीचा हा काळ होता. तेव्हा कायद्याची पुरेशी माहिती नव्हती व ती त्रुटी राहिली, असे सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. मोहन सुरेश प्रभुणे यांनी सुनावणीत सांगितले, ते मान्य होण्यासारखे नाही. माहितीच्या अधिकाराचा कायदा ऑक्टोबर २००५ मध्ये अस्तित्वात आला, अपील मार्च २००६ मध्ये केले आहे आणि त्यानंतरही वर्ष उलटून गेले तरी अपिलाबाबत जन माहिती अधिकारी अथवा जिल्हाधिकारी, सातारा यांच्या पातळीवरुन कोणतीही कार्यवाही केली गेलेली नाही. योग्य माहिती अपीलकर्त्याला त्यांनी कळविणे आवश्यक होते, त्याचबरोबर संबंधित अपिलीय प्राधिका-यांकडे हे अपील त्यांना पाठवता आले असते.

सातारा नगरपरिषदेची स्वतःची अशी बांधकाम नियमावली आहे, नगरपरिषदेच्या विशेष सभेत ठराव क्र. ७६७ (दि. २९.११.२००५) नुसार तीमध्ये काही फेरबदल देखील केले आहेत, असे श्री. राजे यांचे म्हणणे आहे. परंतु सहाय्यक जन माहिती अधिका-यांनी स्वतंत्र नियमावली असल्याचे अमान्य केले. मात्र ठराव क्र. ७६७ नुसार काही बदलांचा प्रस्ताव शासनाला पाठविल्याचे मान्य केले. स्वतंत्र नियमावली असल्याचे श्री. राजे सिध्द करु शकले नाहीत.

दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींची प्रारुप यादी इतर काही नगरपरिषदांनी प्रसिध्द केली आहे. अशी यादी सातारा नगरपरिषद देऊ शकली असती. परंतु ती दिली नाही. १७ बाबींविषयीची माहिती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन वृत्तपत्रांमध्ये तसे निवेदन देणे बंधनकारक आहे, असे प्रतिपादन श्री. राजे यांनी केले. मात्र अशी माहिती कार्यालयीन वेळेत कोणासही पहाता येईल अशा प्रकारे उपलब्ध करण्यात आली आहे. वृत्तपत्रात तसे निवेदन देणे बंधनकारक नाही, असे सहाय्यक जन माहिती अधिका-यांनी स्पष्ट केले. सहाय्यक जन माहिती अधिका-यांनी मूळ उत्तरात दिलेली भूमिकाच पुन्हा मांडली. सातारा शहरातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींच्या यादीबाबत शासनाकडून अद्यापही (दि. २२.५.२००७) निर्णय झालेला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,

सातारा नगरपरिषद, सातारा यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. माहिती मागितल्याला १५ महिने होऊन गेल्यानंतरही यादी तयार नसावी व ती तयार होण्याचा कोणताही निश्चित कालावधी मुख्याधिका-यांना सांगता येऊ नये, यातून माहितीच्या परदर्शकते विषयी प्रश्नचिन्ह उभे राहते, याची नोंद संबंधितांनी घेणे आवश्यक आहे.

वरील बाबी व संबंधित कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. नियमानुसार पुढील अपिलाच्या संदर्भातील माहिती प्रत्येक निर्णयपत्रात देणे आवश्यक आहे, याची नोंद जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी घ्यावी. तसेच आपण अपिलीय प्राधिकारी नसल्यास योग्य त्या अपिलीय प्राधिका-याकडे अपील पाठविण्याची अपीलकर्त्याला तसे कळविण्याची दक्षता जिल्हाधिकारी, सातारा यांनी घ्यावी.

३. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींची यादी निश्चित होताच अपीलकर्त्याला निःशुल्क द्यावी. दि. २०.८.२००७ पर्यंत ही यादी निश्चित न झाल्यास प्रारुप यादी अपीलकर्त्याला द्यावी व तसा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी आयोगाला पाठवावा.

४. बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीबाबतचा नेमका व संपूर्ण तपशील दि. ३०.७.२००७ पर्यंत अपीलकर्त्याला निःशुल्क द्यावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- १८/७/२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर,
पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
सरचिटणीस, महाराष्ट्र शासन दुग्धतंत्रज्ञ संघटना,
'ओंकार' ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ,
शाहूपुरी, सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
पुणे विभाग, पुणे
श्री. महेश मनोहरराव मुळे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
महाव्यवस्थापक,
शासकीय दूध योजना, मिरज,
जिल्हा सांगली.
श्री.एस.डी. खाडे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर,<br>'ओंकार', ३१, अंजली कॉलनी,<br>गेंडा माळ, सातारा-४१५ ००२<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे विभाग, पुणे<br>श्री. महेश मनोहरराव मुळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, मिरज, जि. सांगली<br>श्री. एस. डी. खाडे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.८.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

श्री. एस. बी. शेळके, दुध संकलन पर्यवेक्षक यांना दि. २९ जुलै १९९८ व दि. १४ डिसेंबर १९९८ अन्वये लागू केलेली सुधारित वेतनश्रेणी अनुक्रमे दि. ८.७.१९८१ पासून रु. २९०- ५४० व दि. १.१.१९८६ पासून रु. १२००-१८०० व ७ वर्षाची अर्हताकारी सेवा झालेनंतर रु. १३५०- २२०० अन्वये निश्चित केलेली वेतननिश्चिती, वेतन पडताळणी पथक, पुणे यांनी प्रमाणित केले असलेबाबत त्या वेतन निश्चितीच्या पृष्ठांची व प्रमाणीकरण केलेल्या पृष्ठांची सांक्षाकित केलेली छायांकित प्रत

## विवेचन

श्री. एस.बी. शेळके, दूध संकलन पर्यवेक्षक यांची वेतन निश्चिती वेतन पडताळणी पथक, ुणे यांनी प्रमाणित केली असल्याच्या व वेतन निश्चितीच्या आदेशाच्या छायांकित प्रती अपीलकर्ता

श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, मिरज, जिल्हा सांगली यांच्याकडे मागितल्या होत्या. जन माहिती अधिका-यांनी त्यांना पाठविलेल्या उत्तरात म्हटले आहे, ' श्री. एस.बी. शेळके (दूध संकलन पर्यवेक्षक ) हे आपले संघटनेचे सभासद आहेत किंवा कसे , हे स्पष्ट होत नाही. श्री. शेळके यांनी आपणाकडे कोणत्या कारणास्तव मागणी केली किंवा कसे, हे स्पष्ट होत नाही. तसेच आपले अर्जावरुन माहिती कोणत्या कारणास्तव मागविणेत येत आहे, हे स्पष्ट होत नाही. तरी याबाबत आवश्यक तो खुलासा करणेत यावा.' यावर श्री. वाडेकर सरचिटणीस असलेल्या दुग्धतंत्रज्ञ संघटनेने जन माहिती अधिका-यांना सविस्तर खुलासापत्र पाठविले. 'राज्यातील एकूण ३२५ दुग्धशाळा पर्यवेक्षकांच्या हिताच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे दूध संकलन पर्यवेक्षक यांचे वेतननिश्चितीच्या धर्तीवर दुग्धशाळा पर्यवेक्षकांची वेतननिश्चिती करणे बंधनकारक आहे, हे वेतन पडताळणी पथकाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी ' आपण ही माहिती मागत असल्याचे त्यात त्यांनी स्पष्ट केले आहे.

जन माहिती अधिका-यांकडून काहीही प्रतिसाद न मिळाल्यामुळे श्री. वाडेकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. संबंधित कागदपत्रे देण्याचे आदेश अपिलीय प्राधिका-यांनी दि. १२.५.२००६ रोजी आदेश दिले. परंतु तरीही आपल्याला माहिती देण्यात आली नाही, या कारणावरुन श्री. वाडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. आपल्याला ही माहिती २४ तासांच्या आत मिळणे आवश्यक असल्याचेही श्री. वाडेकर यांनी अर्जात नमूद केलेले आहे. दरम्यान, ' श्री. एस.बी. शेळके, दूध संकलन पर्यवेक्षक यांचेबाबत जी वेतनश्रेणी लागू केलेली आहे ती वेतननिश्चिती ही वेतन पडताळणी पथक, पुणे यांनी प्रमाणित केलेली नसल्याने देता येत नाही ,'असे जन माहिती अधिका-यांनी दि. ४.७.२००६ रोजी श्री. वाडेकर यांना पत्रान्वये कळविले.' आवश्यकता वाटल्यास वेतननिश्चिती केलेल्या सेवापुस्तकाची छायांकित प्रत व वेतन पडताळणी पथकाने लावलेल्या आक्षेपांची प्रत त्यांना देता येईल,' असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे विभाग, पुणे श्री. महेश मनोहरराव मुळे यांनी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. सुनावणीच्या वेळीच आपल्याला माहिती मिळाली, मात्र अपिलीय प्राधिका-यांनी

माहिती देण्यासाठी याआधी दोन वेळा आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी झाली नाही , याकडे श्री. वाडेकर यांनी लक्ष वेधले.

वरील विवेचनातून पुढील बाबी स्पष्ट होतात :

१) जन माहिती अधिका-यांनी मूळ अर्जात दिलेले उत्तर माहितीचा अधिकार अधिनियमाशी विसंगत आणि नियमबाह्य आहे. श्री. शेळके संघटनेचे सभासद आहेत का, इत्यादी स्वरुपाची त्यांनी केलेली विचारणा अप्रस्तुत व माहितीचा अधिकार कायद्याच्या कक्षेबाहेरची आहे. माहिती मागण्याचा उद्देश विचारता येणार नाही, अशी स्पष्ट तरतूद आहे. तरीही माहिती कशासाठी हवी आहे, याची विचारणा त्यांनी केली आहे.

२) कायदा आल्यानंतरच्या प्रारंभीच्या काळातील हा विषय असल्यामुळे उत्तरात चूक झाल्याचे माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, मिरज श्री. एस.डी. खाडे यांनी स्पष्ट केले. प्रथम अपिलाची सुनावणीही विहित मुदतीत झालेली नाही. अपिलाच्या तारखेपासून सुमारे चार महिन्यांनी निर्णय दिला गेला आहे. तसेच अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या आदेशानंतरही माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी तत्परता दाखविलेली नाही.

३) २४ तासात माहिती मिळावी हा अर्जदाराचा मुददा अप्रस्तुत आहे. उभय बाजूंची लेखी व तोंडी निवेदने आणि संबंधित कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. विलंबाबाबतचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती वेळेत व नेमकी देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना, तसेच अपिलाची सुनावणी विहित मुदतीत करुन आदेशाची अंमलबजावणी होण्याबाबत दक्षता घेण्याची अपिलीय प्राधिका-यांना समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १७ .७.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. विजय विष्णुपंत शिंदे
रा. १२२, रविवार पेठ, पुणे-४११ ००२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड पुणे,
डॉ. द.दि. देशमुख — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
कायदा अधिकारी,
पुणे विद्यापीठ, पुणे
श्री. बी.डी. उढाणे

| | | |
|---|---|---|
| १ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |
| २ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. विजय विष्णुपंत शिंदे,<br>रा. १२२, रविवार पेठ, पुणे-४११ ००२<br>प्रा. अतुल बागुल व प्रा. श्री.मा. भावे<br>(अपीलकर्त्याचे प्रतिनिधी )<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे<br>डॉ. द.दि. देशमुख |

| | |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी<br>कायदा अधिकारी,<br>पुणे विद्यापीठ, पुणे<br>श्री. बी.डी. उढाणे |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १४८ / पुणे | दि. २.६.२००६ | दि. २९.६.२००६ | दि. २४.७.२००६ | दि. २५.८.२००६ |
| ३५३ / पुणे | दि. ८.५.२००६ | दि. १३.६.२००६ | दि. २१.६.२००६ | दि. २९.७.२००६ |
| ३२८ / पुणे | दि. ८.५.२००६ | दि. ७.६.२००७ | दि. ७.६.२००६ | दि. ११.७.२००६ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

अपील क्र. १४८ / पुणे

सन २००२ ते २००६ या कालावधीत पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रामार्फत एन.आर.आय. (अनिवासी भारतीय) व पी.आय.ओ. (पर्सन्स ऑफ इंडियन ओरीजिन - मूळ भारतीय असलेल्या व्यक्ती ) कोट्यातून संलग्न महाविद्यालयांमध्ये व विद्यापीठाच्या विविध विभागात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण माहिती (पासपोर्ट, व्हिजा, प्रतिज्ञापत्र, गुणपत्रिका, पायोजकपत्र इत्यादी सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह )

अपील क्र. ३५३ / पुणे

वरील माहितीबरोबरच १९९८ ते २००६ या कालावधीत आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रात काम केलेल्या सेवकांच्या सेवाशर्ती , नेमणुकीबाबतचे मंजुरी- आदेश, टिप्पणी, पी.आय.ओ. व एन.आर.आय. कोट्यातील प्रवेशाबाबतचे ठराव इत्यादी.

अपील क्र. ३२८ / पुणे

अपील क्र. ३५३ मधील माहिती देण्यास ५ दिवस विलंब लावल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विजय विष्णुपंत शिंदे यांनी पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रामार्फत एन.आर.आय. (अनिवासी भारतीय) व पी.आय.ओ. (पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजन-मूळ भारतीय असलेल्या व्यक्ती ) कोट्यातून दिल्या जाणा-या प्रवेशाबाबत विस्तृत माहिती मागणारे अर्ज जन माहिती अधिकारी तथा कायदा अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे केले होते. त्यातील काही माहिती मिळाली, काही अपुरी मिळाली व काही पूर्णपणे नाकारली गेली, अशा कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांच्याकडे अपील केले. प्रथम अपिलाच्या निकालानंतरही समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे ही अपिले ऑगस्ट /सप्टेंबर०६ मध्ये दाखल केली आहेत.

पी.आय.ओ. व एन.आर.आय. या दोन कोट्यांमधून विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रामार्फत प्रवेश दिला जातो. या प्रवेशाची प्रक्रिया पारदर्शक असावी व नियमानुसार पात्र असलेल्या व्यक्तींनाच त्याचा लाभ मिळावा, अशा हेतूने आपण सातत्याने या मागणीचा पाठपुरावा करीत असल्याचे श्री. विजय विष्णुपंत शिंदे यांनी नमूद केले आहे. त्यांच्या अपिलांचा हाच मुख्य विषय आहे.

आयोगापुढील अपिलात त्यांच्याबरोबर त्यांची बाजू मांडण्यासाठी प्रा. अतुल बागूल व प्रा. श्री. मा. भावे हे उपस्थित होते. प्रा. बागूल यांनी या मागणीसंदर्भात विद्यापीठाच्या विधिसभेत व अन्य व्यासपीठांवर केल्या गेलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला.

जन माहिती अधिकारी तथा कायदा अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे श्री. बी.डी. उढाणे यांनी माहिती नाकारताना प्रामुख्याने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ मधील (१) (अे), (इ), (जी), (जे) या तरतुदींचा आधार घेतला आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची श्री. शिंदे यांना हवी असलेली माहिती देणे शक्य नाही, असे वरील तरतुदींनुसार जन माहिती अधिका-यांनी म्हटले आहे. अशी माहिती उघड केल्याने 'विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता, तसेच विद्यार्थ्यांच्या खाजगीपणावर अतिक्रमण' येथपासून 'भारताच्या अन्य देशांबरोबरच्या आर्थिक संबंधावर दुष्परिणाम होण्याच्या शक्यते'पर्यंत विविध कारणे वरील तरतुदींच्या आधारे नमूद केली आहेत.

विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांकडून येणारा दस्तऐवज हा विश्वासाश्रित संबंधामुळे प्राप्त होतो, असे जन माहिती अधिका-यांनी म्हटले आहे. त्या त्या वेळचे अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव श्री. एम.एस. जाधव (अपील क्र. ३२८), प्रभारी कुलसचिव डॉ. कॅ. सी.एम. चितळे (अपील क्र.३५३) व कुलसचिव डॉ. द.दि. देशमुख (अपील क्र. १४८) यांनी जन माहिती अधिका-यांचा निर्णय ग्राह्य ठरवून श्री. शिंदे यांची अपिले फेटाळली आहेत.

विश्वासाश्रित संबंधाबरोबरच त्यात पाल्य-पालकत्वाचीही भावना असते, असे डॉ. द.दि. देशमुख यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

प्रथम अपिलाच्या सुनावणीत आपले म्हणणे ऐकून घेतले नाही, असे श्री. शिंदे यांनी नमूद केले आहे. ही तक्रार रास्त आहे. अपिलीय प्राधिका-यांनी दिलेले निर्णयपत्र पहाता केवळ विद्यापीठांतर्ग अधिका-यांची बाजू त्यांनी ऐकून घेतल्याचे स्पष्ट होते. ही पध्दती योग्य नाही. अपिलाच्या सुनावणीत अर्जदारालाही त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे.

माहिती देण्यास पाच दिवस विलंब झाल्याचे श्री. शिंदे यांचे म्हणणे आहे (अपील क्र. ३२८), तर आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राकडून, ही माहिती मागविली. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५(२) नुसार हा जादा अवधी घेतला हे जन माहिती अधिका-याचे समर्थन अपिलीय प्राधिका-यांनी मान्य केले आहे. विद्यापीठांतर्गत विभागाकडून घ्यावयाच्या माहितीबाबत या तरतुदीचा असा आधार घेता येणार नाही. परंतु माहितीचे स्वरुप लक्षात घेता हा कालावधी क्षमापित करावा, ही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

उपरोक्तपैकी एन.आर.आय. कोटा आता बंद झाला असून आखाती देशामध्ये काम करणा-या भारतीयांच्या मुलांसाठी प्रामुख्याने तरतूद असलेला पी.आय.ओ. कोटा चालू आहे.

या कोट्यातील प्रवेशाबाबत केंद्रीय गृहखाते, परराष्ट्र खात्यांतर्गत भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, केंद्रीय गुप्तचर विभाग आदि अनेक पातळ्यांवर तपासणी होऊनच प्रवेश दिला जातो, असे श्री. उढाणे व श्री. देशमुख यांनी मूळ अर्जाला दिलेल्या उत्तरात व प्रथम अपिलाच्या निर्णयपत्रात म्हटले आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांबाबतची माहिती देताना केंद्र सरकारमधील अनेक खात्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल, असे आंतरराष्ट्रीय केंद्राच्या संचालकानी म्हटल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिका-यांनी ते ग्राह्य मानले आहे. आयोगापुढील सुनावणीत त्यांनी ते विस्ताराने विषद केले. तसेच या सर्वावर

देखरेख करण्यासाठी केंद्रातर्फे सचीव दर्जाचा स्वतंत्र अधिकारी विद्यापीठात कार्यरत असतो, असेही त्यांनी सांगितले.

'माहिती उघड केल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका असल्याचे विद्यापीठातर्फे सातत्याने सांगितले जात असले तरी कोणताही पुरावा (उदा. विद्यार्थ्यांनी केलेली लेखी तक्रार ) जन माहिती अधिकारी अथवा कुलसचिव देऊ शकलेले नाहीत. वरील कोट्यामधून प्रवेश दिलेल्यांमध्ये अनेक उच्च पदस्थांची मुले असल्याचे जन माहिती अधिका-यांच्या उत्तरात म्हटले आहे. मुळात हा कोटा उच्च पदस्थांसाठी अशा स्वरुपाचा नाही, तसेच केवळ उच्च पदस्थांची मुले आहेत म्हणून माहिती नाकारणे योग्य नाही. अपात्र व्यक्तींना दिले गेलेले प्रवेश उघड होऊ नयेत यासाठी माहिती नाकारली जात आहे. तसेच विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांनी दाखल केलेली कागदपत्रे विश्वासाश्रित संबंधामुळे नव्हे, तर नियमानुसार आवश्यक भाग म्हणून आलेली आहेत. केंद्रीय माहितीचा अधिकार कलम ४ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वंयस्फूर्तीने जाहीर करावयाच्या माहितीचा यातील बव्हंश भाग आहे. म्हणून ती माहिती मिळाली पाहिजे', असे प्रतिपादन श्री. शिंदे व त्यांच्या प्रतिनिधींनी केले. 'सर्व परदेशी विद्यार्थ्यांची माहिती आपण मागत नसून फक्त पी.आय.ओ. व एन.आर.आय. कोट्यातील विद्यार्थ्यांची माहिती मागतो आहोत. प्रवेश प्रक्रिया पारदर्शक असावी आणि वरील कोट्यातील प्रवेशाला पात्र असल्याचे विद्यार्थ्यांच्या कागदपत्रातून सिध्द व्हावे,' अशी आपली भूमिका असल्याचे श्री. शिंदे यांनी स्पष्ट केले. माहिती नाकारण्यासाठी कलम ८ मधील तरतुदींचा घेतलेला आधार अयोग्य असल्याचे त्यांनी वरील अनुषंगाने नमूद केले.

प्रवेश प्रक्रियेत कोणतीही गैर बाब नाही, आम्ही माहिती लपवू इच्छित नाही, परंतु विषयाची संवेदनशीलता लक्षात घेता सर्व कागदपत्रे सरसकट उपलब्ध करुन देता येणार नाहीत. संपूर्ण कागदपत्रे आयोगाला उपलब्ध करुन देण्याची विद्यापीठाची तयारी आहे, असे कुलसचिव श्री. देशमुख यांनी निःसंदिग्धपणे नमूद केले. त्याची नोंद आयोग घेत आहे. आवश्यक वाटल्यास आयोग अशा निरीक्षणाचा विचार करील.

आयोगापुढील सुनावणीत उभय बाजूंनी केलेली निवेदने व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता उभय बाजू टोकाची भूमिका घेत असून काही बाबतीत अतिव्याप्त विधाने करीत आहेत, असे दिसते. 'मागितलेल्यापैकी काही माहिती संबंधितांकडून नष्ट केली जाण्याची शक्यता आहे,'

यापूर्वी असे प्रकार घडले आहेत, असे विधान अपीलकर्त्याने केले आहे. 'आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना त्रास दिला जाण्याची भीती ही माहिती लपविण्यासाठीची सबब आहे,' असेही त्यांनी म्हटले आहे. वरील अपिलांमध्ये बँक खात्याबद्दलच्या मागणीचा कोणताही उल्लेख नसताना उत्तरवादीने 'बँक खात्याचा तपशील देता येणार नाही' असे सांगितले. 'पासपोर्ट, व्हिजासह सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या पाहिजेत. ही कागदपत्रे विद्यापीठाकडे आहेत, म्हणजे खाजगी नाहीत; ती सर्वांना उपलब्ध असली पाहिजेत,' असा अपीलकर्त्याचा दावा आहे, तर 'ही कागदपत्रे देण्यामुळे देशाच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व अन्य हितसंबंधावर परिणाम होण्याची शक्यता आहे,' असे उत्तरवादीचे म्हणणे आहे. ही काही अशा टोकाच्या व अतिव्याप्त विधानांची उदाहरणे आहेत. संबंधित विद्यार्थ्यांच्या माहितीबाबत केंद्र सरकारच्या अनेक खात्यांची परवानगी घ्यावी लागेल, हाही असाचा अतिशयोक्त व अयोग्य युक्तिवाद आहे.

विद्यार्थी व विद्यापीठ यांच्यात पाल्य-पालक अशी भावना असू शकते, असावीही. परंतु विद्यार्थी जे दस्तऐवज विद्यापीठाला सादर करतात ते विश्वासाश्रित संबंधामुळे, असे म्हणता येणार नाही. प्रवेशादि प्रकियांसाठी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांच्या पूर्ततेचा तो भाग असतो. विश्वासाश्रित संबंधाचे सूत्र यास लागू होत नाही.

परदेशी विद्यार्थ्यांची सुरक्षितता व पासपोर्ट, व्हिजा यासारख्या वैयक्तिक कागदपत्रांच्या माहितीबाबतची संवेदनशीलता याचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठावरील जबाबदारी लक्षात घेता अशी कागदपत्रे सरसकट उपलब्ध करुन देणे योग्य नाही. त्यामुळे ही कागदपत्रे देणे नाकारण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. परतु सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हे माहितीचा अधिकार कायद्यातील केंद्रीभूत सूत्र आहे, हे लक्षात घेता आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यी केंद्रातीलही प्रवेश प्रक्रिया पारदर्शक असावी, हे अमान्य करता येणार नाही. या दोन्हीचा मेळ घालणे शक्य व आवश्यक आहे.

अपीलकर्त्याने पाच ते आठ वर्षांमधील अत्यंत विस्तृत व तपशीलवार अशी माहिती मागितली आहे. त्यात व्यापक लोकहिताचा समावेश होत नाही, अशी भूमिका आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राच्या संचालकांपासून कुलसचिवांपर्यंत सर्वांनी नमूद केली आहे, ती योग्य नाही. विशिष्ट कोट्यामधून

विद्यार्थ्यांना दिले जाणारे प्रवेश हा निश्चितच सार्वजनिक हिताचा विषय आहे, मात्र माहिती प्राप्त करु इच्छिणा-यांकडूनही त्याचा तसा उपयोग केला जाणे हेही आवश्यक व महत्त्वाचे आहे.

उभय बाजूंची विस्तृत निवेदने व कागदपत्रे यांचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रामार्फत एन.आर.आय. व पी.आय.ओ. कोट्यातून प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांचे पासपोर्ट, व्हिजा, केंद्रीय गुप्तचर खात्याचा अहवाल, न्यायालयासमोर विद्यार्थ्यांनी केलेली प्रतिज्ञापत्रे, कामाचा परवाना ही कागदपत्रे देऊ नयेत. मात्र प्रायोजकपत्राच्या प्रती द्याव्यात. तसेच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची नावे, त्यांचे देश, पालकांची नावे व त्यांना प्रवेश दिलेला अभ्यासक्रम ही माहिती संकलित स्वरुपात द्यावी. दि. १०.८.२००७ पर्यंत ही माहिती द्यावी. तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

३. माहिती देण्यास पाच दिवस विलंब झाल्याचा आक्षेप (अपील क्र. ३२८) अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १०/७/२००७

सांगली/८८६

# राज्य माहिती आयोग, पुणे विभाग, पुणे

५२८

क्र.रामाआ/अपिल /२०११७/सांगली/२००७
राज्य माहिती आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिलहॉल समोर, पुणे १.
फोन क्रमांक : २६११ १२३९
दिनांक :-१० / ७ /२००७

प्रति,

अपर पोलीस अधीक्षक,
सांगली

विषय : - श्री. अरविंद नामदेव शिंदे राहणार सांगली यांनी केलेले अपिल अर्ज दि.१०/४/२००६ निकाली काढणेबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र अपील/२००७/८८६/०२ दि. २७/२/०७

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की श्री. अरविंद नामदेव शिंद, रा. गगनगिरी, १०० फुटी रोड, पाकीजा मशिदजवळ, सांगली यांनी दि. १९/४/२००६ रोजी आपल्या विरुद्ध या आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले होते. ~~आपले संदर्भाधीन पत्र व त्यासोबतचे~~ श्री. अरविंद नामदेव शिंदे यांचा दि. निरंकवा अर्ज पाहता श्री. शिंदे यांना माहिती मिळाली असल्याने त्यांनी आपले अपिल निकाली काढण्याचे कळविले आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता श्री. शिंदे यांनी आयोगाकडे दि. १९.४.२००६ रोजी दाखल केलेले द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे असे मा राज्य माहिती आयुक्ताचे निर्देश आहेत.

आपला

मा. राज्य माहिती आयुक्तांच्या पृ.क्र. २७/कवी येथील निदेशानुसार पत्राचे प्रारूप कार्यालयाकडे सादर केले आहे
(सही) १०/७/०७

का. प्र.
(सही) १०/७/०७

सचिव

(सही) १२.०७.०७
(रा. म. गेंगजे)
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग
पुणे विभाग, पुणे

प्रत: श्री. अरविंद नामदेव शिंदे गगनगिरी, १०० फुटी रोड, पाकीजा मशिदजवळ, सांगली यांना कळविण्यात येते की, आपण पोलिस अधीक्षक, सांगली यांच्याकडे केलेल्या दि. निरंक अर्ज पाहता त्यांचे दि. १९.४.२००६ चे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

निर्गमित केल्याचा दिनांक
व स्वाक्षरी (सही)
१२/७/०७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. धनंजय सुरेश शिंदे
मु.पो.देहूगांव, ता.हवेली, — अपीलकर्ता
जि.पुणे

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी (पंचायत ) — उत्तरवादी
पंचायत समिती, हवेली
श्री. बी.टी. पवार

जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी, देहू,
ता.हवेली, जि.पुणे
श्री. नामदेव पांडुरंग पावडे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |
| ३ | उपस्थित | **अपिलीय प्राधिकारी** तथा<br>गट विकास अधिकारी, (पंचायत)<br>पंचायत समिती, हवेली<br>श्री. बी.टी. पवार |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | बी.पी.एल. व हच च्या टॉवरपासून जीवितास व वहिवाटीस धोका असून बाधा पोहचत आहे. नागरी हक्क सरंक्षण कायदा १९५५ व अनु.जाती/अनु. जमाती १९८९ च्या तरतुदीनुसार संरक्षण मिळणेबाबत, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे लोक - वस्तीच्या ठिकाणी टॉवर बांधकाम प्रतिबंध असताना ग्रामपंचायतीने कशाच्या आधारावर टॉवरला परवानगी दिली, त्याबाबत माहिती |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. धनंजय सुरेश शिंदे, रा. देहूगांव, ता. हवेली, जि. पुणे यांनी आपल्या घराशेजारील इमारतीवर बी.पी.एल. व हच या कंपनीने उभ्या केलेल्या टॉवरबाबत ग्रामपंचायतीकडे व जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रार अर्जाबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. ग्रामपंचायतीने या टॉवरला दिलेल्या ना हरकत दाखल्याची व परवानगीच्या ठरावाची प्रत त्यांना देण्यात आली आहे. परंतु जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. शिंदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्याकडे अपील दाखल केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या वतीने याबाबत दि. १९.६.२००६ रोजी पाठविण्यात आलेले पत्र माहिती अधिकार कायद्याबाबतच्या निष्काळजीपणाचे निदर्शक आहे.

"आपण मागितलेली माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असून ग्रामसेवक हे शासकीय माहिती अधिकारी असून प्रथम अपिलीय अधिकारी गट विकास अधिकारी आहेत व <u>द्वितीय माहिती अधिकारी</u> हे राज्य मुख्य माहिती आयुक्त हे आहेत," असे या पत्रात म्हटले आहे. त्याच्या पुढील परिच्छेदात,

"आपण व्यथित झाला असाल तर आपण द्वितीय अपिलीय अधिकारी तथा राज्य माहिती आयुक्त यांचेकडे अपील करावे," असे नमूद केले आहे. माहितीचा अधिकार कायद्यातील तपशिलाबाबत दक्षता न घेता व अर्ज/अपील संबंधितांकडे पाठविण्याऐवजी दप्तरी दाखल केला आहे.

टॉवरला परवानगी देण्याबाबत ग्रामसेवकाच्या वर्तनाविषयी आपल्याला संशय असल्याचे श्री. शिंदे यांनी म्हटले आहे. परंतु "ग्रामपंचायतीने परवानगी देणारा ठराव केला, त्याच्या प्रतीवर फक्त सरपंचाची सही असल्याने ग्रामसेवक जबाबदार नाही" असे गट विकास अधिकारी, पंचायत समिती हवेली, यांनी म्हटले आहे. टॉवरशी संबंधित तांत्रिक बाबी वगैरे भाग या अपिलात अप्रस्तुत आहे. आपण अनुसूचित जाती संवर्गातील असून आपल्याला व आपल्या कुटुंबाच्या जीविताला व वहिवाटीला टॉवरमुळे बाधा येत असून त्याबाबत आपल्याला सरंक्षण मिळावे, ही श्री. शिंदे यांची मुख्य मागणी आहे. हा माहितीच्या अधिकाराच्या कक्षेतील विषय नाही.

वरील बाबी विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

**पुणे**
**दिनांक : ४/७/२००७**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. मनजितसिंग गुरुमितसिंग मीन्हास
रा. फ्लॅट नं.४, नीळकंठ को.ऑप.हौ. सोसायटी,
बॉम्बे सॅपर्स कॉलनी, वडगांव शेरी, पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलिस सह आयुक्त,
पुणे शहर. — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
पोलिस उप आयुक्त मुख्यालय,
पुणे शहर, पुणे
श्री. रवीन्द्र सेनगावकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. मनजितसिंग गुरुमितसिंग मीन्हास<br>रा. फ्लॅट नं.४, नीळकंठ को.ऑप.हौ. सोसायटी, बॉम्बे सॅपर्स कॉलनी,<br>वडगांव शेरी, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा**<br>पोलिस उप आयुक्त मुख्यालय,<br>पुणे शहर, पुणे<br>श्री. रवीन्द्र सेनगावकर |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.७.२००६ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | कामावरुन काढून टाकलेने परत रुजू करुन घेणे, पोलिसात झालेल्या तक्रारी व मध्यस्थांस दिलेले पैसे परत मिळणे याबाबत पोलिसांनी कारवाई करावी |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मनजितसिंग गुरुमितसिंग मीन्हास, बॉम्बे सॅपर्स कॉलनी, वडगाव शेरी, पुणे हे 'टाटा मोटर्स लि.,' पिंपरी येथे कामाला होते. त्यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. त्या संदर्भात कंपनीने त्यांच्याविरुध्द व त्यांनी संबंधितांविरुध्द पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारींच्या संदर्भात अपेक्षित कारवाई हा या अपिलातील मुख्य विषय आहे. सन २००४-२००५ सालातील घटनांशी व मे २००६ मध्ये श्री. मिन्हास यांनी दाखल केलेल्या तक्रारीशी संबंधित असा हा विषय आहे. 'टाटा मोटर्स'मध्ये सौ. अनूपमा दत्तात्रय जाधव, रा. भोसले अपार्टमेंट, फ्लॅट नं.३, नेहरुनगर, पिंपरी, पुणे यांच्या मध्यस्थीने आपल्याला पुन्हा कामावर घेण्यासाठी आपण एक लाख रुपये दिले आहेत. कामावर रुजू होण्याचे पत्र न दिल्यास पैसे परत करण्याचे त्यांनी कबूल केले होते. पुन्हा कामावरही घेण्यात आले नाही व ही रक्कमही परत मिळाली नाही, अशी श्री. मिन्हास यांची तक्रार आहे. पोलिसांनी याची चौकशी करुन जाबजबाब नोंदविले आहेत. परंतु नोकरीवर पुन्हा घेण्याच्या मागणीसह हा सर्व विषय पोलिसांच्या कक्षेतील नाही. त्यामुळे श्री. मिन्हास यांनी आवश्यक वाटल्यास न्यायालयाकडे दाद मागावी, असे पोलिसांनी त्यांच्या माहितीच्या कायद्याखालील अर्जाबरोबरच इतर अर्जांबाबतही स्पष्ट केले आहे व प्रत्यक्षही सांगितले आहे, असे सुनावणीच्या दरम्यान स्पष्ट झाले. हा सर्वच विषय माहितीच्या अधिकाराच्या कायद्याच्या कक्षेतील नाही. त्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**पुणे**
**दिनांक :- ४/७/२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. शिवदास रंगनाथ साळुंखे,
फ्लॅट नं.बी.१०, आनंदनगर,सनसिटी रोड,
निर्मल टाऊनशिप जवळ, सिंहगड रोड,
पुणे - ४११ ०५१

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. प्रशांत मधुकर वाघमारे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. शांताराम ख. थोरात

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. शिवदास रंगनाथ साळुंखे,<br>फ्लॅट नं.बी.१०, आनंदनगर, सनसिटी रोड, निर्मल टाऊनशिप जवळ,<br>सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>नगर अभियंता,<br>पुणे महानगरपालिका, पुणे<br>श्री. प्रशांत मधुकर वाघमारे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण,<br>पुणे महानगरपालिका, पुणे<br>श्री. शांताराम ख. थोरात |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | एरंडवणा, फायनल प्लॉट नं.३६, सिटी सर्व्हे नं.१५५ व १५७ मधील इमारतीचे मंजूर नकाशे व भोगवटा प्रमाण पत्राचे सांक्षाकित प्रती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवदास रंगनाथ साळुंखे यांनी एरंडवणा फायनल प्लॉट नं. ३६, सिटी सर्व्हे क्र. १५५ व १५७ मधील इमारतीचे मंजूर नकाशे व भोगवटा प्रमाण पत्राचे साक्षांकित प्रत अशी माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी नियमाने घालून दिलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत कोणतीही

माहिती अगर उत्तर दिले नाही. त्यामुळे श्री. साळुंखे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे दि. १२.४.२००६ रोजी अपील केले. त्यानंतर दि. १९.४.२००६ रोजी सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण क्र.५-, पुणे महानगरपालिका यांनी श्री. साळुंखे यांना उत्तर पाठविले. 'विषयांकित ठिकाणी फायनल प्लॉट नं. ३६ मध्ये सि.स.नं.१५५ व १५७ येत नाही. तसेच नकाशे मान्य कधी झालेले आहे व भोगवटा पत्र घेतलेले आहे अगर कसे, हे अर्जामध्ये नमूद केल्यास प्रकरणाचा शोध घेणे सोईचे होईल,' असे त्यांनी या पत्राद्वारे कळविले. म्हणजे पुणे महानगरपालिकेकडे अपेक्षित असलेली माहिती देण्याऐवजी अर्जदारालाच माहिती विचारली. दरम्यानच्या काळात अपील केले असल्यामुळे या पत्राला उत्तर दिले नाही, असे श्री. साळुंखे यांनी कळविले. मात्र नंतर आपण नमूद केलेल्या प्लॉटबाबत स्पष्टीकरणात्मक माहिती श्री. साळुंखे यांनी कळविली. त्यानुसार एरंडवणा फायनल प्लॉट नंबर ३६, सी.टी.एस. क्र. १५५ व १५७ याऐवजी एरंडवणा स.न. ३६, सी.टी.एस.नंबर १५५ व १५७ असा तपशील कळविला.

अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही. मात्र, आपण श्री. साळुंखे यांना दोन वेळा सुनावणीच्या तारखा दिल्या होत्या. परंतु ते उपस्थित राहिले नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. प्रशांत वाघमारे यांनी सुनावणीत सांगितले. सुनावणीच्या दिवशी श्री. साळुंखे उपस्थित राहू शकले नव्हते. दुस-या दिवशी दि. ३०.६.२००७ रोजी समक्ष येऊन त्यांनी आपली बाजू मांडली.

प्रथम अपील केल्यानंतर अपिलाचा संदर्भ देऊन जन माहिती अधिकारी, तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि. १९.५.२००६ रोजी श्री. साळुंखे यांना पत्र पाठवून कळविले, 'विषयांकित प्रकरणी आपण केलेल्या संदर्भांकित अर्जानुसार विषयांकित मिळकतीमधील इमारतीच्या बांधकाम प्रकरणाचा आमचे रेकॉर्ड विभागाकडे शोध घेता आढळ होत नाही, त्यामुळे आपण मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे अडचणीचे आहे.' मात्र विकास अभियंता यांनी असे कळविले असतानाच उपरोक्त सी.टी.एस. नं. १५५ मधील इमारतीचा

नकाशा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण क्र. ५, पुणे महानगरपालिका यांनी नक्कल-शुल्क रु.१००/- घेऊन दि. ४.८.२००६ रोजी श्री. साळुंखे यांना दिला. म्हणजे , 'आढळ होत नाही,' असे कळविलेल्यांतील काही कागदपत्रे तरी उपलब्ध होती, असे स्पष्ट होते. अशा प्रकारे आपल्याला चुकीची व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिली, अशी तक्रार श्री. साळुंखे यांनी सुनावणीत केली.

संबंधित कागदपत्रे सन १९८५ ते १९८८ या कालावधीतील आहेत. जुने अभिलेख विविध ठिकाणी ठेवले गेले असल्यामुळे ते शोधण्यास अधिक अवधी लागतो, म्हणून वेळेत माहिती कळविता आली नाही, असे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. शांताराम खंडेराव थोरात यांनी दिले. परंतु प्रथम अपिलाला वर्ष उलटून गेले असले तरी अद्यापिही माहिती दिली गेलेली नाही. हा विलंब समर्थनीय नाही.

अपीलकर्त्याशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करु, असे निवेदन श्री. वाघमारे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता अर्जदाराला माहिती देण्याबाबत अनास्था व विलंब झाला आहे, अभिलेख आढळ होत नसल्याची चुकीची माहिती दिली आहे. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत योग्य ती दक्षता घेतली गेलेली नाही, असे स्पष्ट होते.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्र लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. विलंबाने व चुकीची माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. शांताराम खंडेराव थोरात, तसेच अर्जाला उत्तर देणारे आणि म्हणून सहाय्यक जन माहिती अधिकारी ठरणारे सहाय्यक विकास अभियंता श्री. सुरेश वामन कडू यांना केवळ विलंबाचा विचार केल्यास प्रत्येकी रु. २५०००/- शास्ती लावणे योग्य ठरावे. परंतु अपेक्षित असलेल्या अभिलेखाचा कालावधी व त्याबाबतच्या अडचणी लक्षात घेऊन विलंबाचे दिवस व चुकीची माहिती देणे याचा विचार करुन प्रत्येकी रु. ५५००/- शास्ती लावण्यात येत आहे. त्यांच्या माहे जुलै २००७ च्या

वेतनातून ही शास्ती वसूल करुन '००७, इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करावी. नगर अभियंता यांची ही जबाबदारी राहील. त्याबाबतचा पूर्तता अहवाल त्यांनी दि. ५.८.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

२. अपीलकर्त्याला दि. २० जुलै २००७ पर्यंत सर्व माहिती जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी निःशुल्क द्यावी. तसेच ती दिली जाईल यांची दक्षता अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी घ्यावी.

**पुणे**
**दि. ७ /७/२००७**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग पुणे**

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. सचिन सुभाष कांकरीया,
मु.पो.नारायणगाव,ता.जुन्नर,जि.पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे
श्री. राजेंद्र पवार

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पिंपळगाव जोगे धरण विभाग,
नारायणगाव, जि. पुणे
श्री. बी.जी.पालापुरे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. सचिन सुभाष कांकरीया,<br>मु.पो.नारायणगाव,ता.जुन्नर,जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे<br>श्री. राजेंद्र पवार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>पिंपळगाव जोगे धरण विभाग,<br>नारायणगाव, जि. पुणे<br>श्री. बी.जी.पालापुरे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | पिंपळगाव जोगे धरण कालव्यासाठी मिळालेला निधी व त्याच्या खर्चा तपशील, तसेच किती व कोणत्या ठेकेदारीमार्फत कामे सुरु आहेत व त्यांच्या टेंडर्सची रक्कम, शासनाने कालव्यासाठी किती निधी दिला आहे. ३१ मार्च २००६ पर्यंतची माहिती व कालव्याचे काम पुर्ण कधी होणार आहे. कार्यालयातील स्टाफ संख्या येथील पदभाराचा कालावधी कार्यालया अंतर्गत जुन्नर तालुक्यातील किती कर्मचारी व अधिकारी किती वर्षापासून काम करीत आहेत याची सविस्तर माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सचिन सुभाष कांकरिया यांनी पिंपळगाव जोगे धरणकालव्यासाठी मिळालेल्या निधीच्या संदर्भात, तसेच पिंपळगाव जोगे धरण विभागाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती व काम या संदर्भात दि. २९.५.२००६ रोजी माहिती मागितली होती . जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पिंपळगाव जोगे धरण विभाग, नारायणगाव यांनी अर्ज विहित नमुन्यात नसल्याचे दि. २.६.२००६ रोजी कळवून, पुन्हा अर्ज करण्यास सांगितले . त्यानुसार श्री कांकरिया यांनी दि ८.६.०६ रोजी पुन्हा अर्ज केला . जन माहिती अधिकारी यांना तो दि १३.६.२००६ रोजी मिळाला . त्यांनी दि १४.६.२००६ रोजी उत्तर पाठवून रु १०७ भरण्यास सांगितले . परंतू ३० दिवसांच्या मुदतीत माहिती मिळाली नाही, या कारणावरुन श्री. कांकरिया यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,कुकडी प्रकल्प मंडळ ,पुणे यांच्याकडे अपील केले. पैसे भरल्यानंतर पुढील ३० दिवसात माहिती दिली जाईल असे आपण कळविले असल्यामुळे, दि. २७.७.२००६ रोजी माहिती दिली. ती मुदतीतच आहे, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले . मात्र वाढीव कालावधीची मागणी करताना त्याची कारणेही नमूद केली पाहिजेत, अशी सूचना त्यांनी दिली. आपल्याला दिलेली माहिती ७ पानांची असून आपल्याकडून घेतलेल्या १०७/- रु.- मधील खर्चाचे रुपये ५१/- वजा जाता उर्वरित (५६रु.)रक्कम त्वरित परत करणे आवश्यक होते, हे श्री कांकरिया यांचे म्हणणे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, या मागणीसाठी श्री कांकरिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. विविध उप विभागांकडून माहिती घेण्यास वेळ लागल्यामुळे संकलन करुन माहिती देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पिंपळगाव जोगे धरण विभाग, नारायणगाव, जिल्हा पुणे श्री. बी.जी.पालापुरे, अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे श्री. राजेंद्र पवार यांनी मान्य केले. दि. १.८.२००६ पर्यंत माहिती पाठविली जाईल, असे पत्राने कळविले होते, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु असे पत्र आपल्याला मिळाले नसल्याचे श्री. कांकरिया यांनी निदर्शनास आणले.

श्री. कांकरिया यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली आहे. खर्चातील राहिलेली रक्कम रु. ५६/- त्यांनी न स्वीकारल्यामुळे परत केली गेलेली नाही.

विहित नमुन्याचा आग्रह धरुन माहितीच्या मागणीचा अर्ज नाकारणे अथवा फेर अर्ज करण्यास सांगणे योग्य नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी कायदा नीट समजून घेऊन याबाबत अधिक दक्षता घेणे आवश्यक आहे.

वरील परिस्थिती लक्षात घेता राज्य माहिती आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्याची उर्वरित रक्कम, तसेच विलंब लक्षात घेता माहिती देण्यासाठी स्वीकारलेली रक्कम रु. ५१/- असे रु. १०७/- जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या व्यक्तिगत मिळकतीतून अपीलकर्त्याला परत करावे .

३. माहिती देण्यास लागलेल्या विलंबाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण स्वीकारण्यात येत आहे, त्यामुळे शास्ती नाही.

पुणे
दिनांक :- २/७/२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे